
Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - V

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi Part - V | January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI PART - V


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | समीक्षेचा वयापक दृष्टिकोन : संदर्भलक्षी समीक्षा<br>**डॉ. कैलास अंभुरे** | १-११ |
| २ | साहित्यसौंदर्याची तत्वे (सूचकता व व्यामिश्रता)<br>**प्रा. अनुराधा मनोहर मोरे (मधुरा जनार्दन सोनवणे)** | १२-१७ |
| ३ | तौलनिक साहित्य समीक्षेची सैध्दांतिक मांडणी<br>**अरुणा माणिक गायकवाड** | १८-२[illegible] |
| ४ | मार्क्सवादी साहित्य समीक्षा : स्वरुप व आकलन<br>**डॉ. अतुल मधुकरराव देशमुख** | २४-२७ |
| ५ | जनवादी साहित्य समीक्षा<br>**भाग्यशाली लेखराज कांबळे** | २८-३२ |
| ६ | तौलनिक साहित्याभ्यास आणि तौलनिक साहित्यसमीक्षा<br>**डॉ. भरत जाधव** | ३३-४२ |
| ७ | साहित्यसमीक्षेची उद्दिष्टे आणि कार्ये<br>**प्रा. डॉ. सुशील प्रकाश चिमोरे** | ४३-४७ |
| ८ | काव्यात्म साहितय समीक्षा<br>**ज्ञानेश्वर अशोक तिखे** | ४८-५१ |
| ९ | नव्या साहित्य प्रवाहाराच्या शोधातील मराठी समीक्षा<br>**डॉ. प्रदीप औजेकर** | ५२-५६ |
| १० | शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा मानुषता सिद्धान्त : एक वाचन<br>**डॉ. मनीषा खैरे** | ५७-६३ |
| [illegible]१ | समीक्षा संकल्पना आणि मानसशास्त्रीय समीक्षा<br>**प्रा. हरिभजन राम कांबळे** | ६४-६८ |
| १२ | मार्क्सवादी समीक्षा : एक शोध व बोध<br>**डॉ. हरिदास आखरे** | ६९-७१ |
| १३ | ग्रामीण कवितेची समीक्षा : विशेष संदर्भ "बोलावे ते आम्ही" या संग्रहातील आधुनिकता<br>**डॉ. जिजा शिंदे** | ७२-७८ |
| १४ | आदिवासी साहित्य समीक्षा : एक दृष्टीकोन<br>**प्रा. नागनाथ करडे** | ७९-८२ |
| १५ | स्त्रीमनात आत्मविश्वास पेरणारी कविता : 'आभाळ अंतरीचे'<br>**प्रा. डॉ. मारोती द. कसाब** | ८३-८८ |




Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ११. समीक्षा संकल्पना आणि मानसशास्त्रीय समीक्षा

प्रा. हरिभजन राम कांबळे
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

माणसाकडे योग्य काय आणि अयोग्य काय हे जाणून घेण्याची प्रवृत्ती फार जुनी आहे. त्याचप्रमाणे एखाद्या गोष्टीवर अनुकूल वा प्रतिकूल प्रतिक्रिया देणे ही देखील माणसाची सहजप्रवृत्ती आहे. माणूस व्यवहारात जसा हा अभिप्राय सहजपणे देतो तसाच तो कलाकृती आणि साहित्यकृती यांच्या संदर्भात देतो. एखादी कादंबरी आपल्याला आवडली नाही, चित्रपट किंवा नाटक कंटाळवाणे वाटले ते आपल्याला का आवडले नाही याची चर्चा आपण मित्रासमवेत करतो आणि त्यांचे मतही जाणून घेतो, अशाप्रकारे एखादा अनुभव घेणे, त्याआधारे आपले मत बनविणे, त्यासंदर्भात इतरांची मते समजावून घेणे, आपले मत त्यांना पटवून देणे या सर्व प्रक्रियेतून 'समीक्षा' निर्माण होते तिच्यासाठी आपण निरीक्षण, परीक्षण असे शब्दही वापरतो. 'समीक्षा' हा शब्द Criticism या इंग्लिश शब्दाला पर्याय म्हणून वापरला जातो. आपल्या शिक्षणपद्धतीवर जसा इंग्लिश भाषा व विचार यांचा प्रभाव आहे तसा मराठी समीक्षेवरही पाश्चात्य समीक्षेचा पगडा आहे. सम + ईक्ष यांच्या मिश्रणातून समीक्षा हा शब्द तयार झाला आहे. 'सम म्हणजे योग्य प्रमाणात -सम प्रमाणात आणि ईक्ष म्हणजे पाहणे- म्हणजेच समीक्षकाने साहित्यकृतीच्या सर्व बाजू नेटकेपणाने पहाव्यात, सहानुभूतीने व रसिकतेने पहाव्यात असा अर्थ येथे अभिप्रेत आहे. मराठीमध्ये पूर्वी समीक्षा आणि समीक्षक या अर्थाने टीका आणि टीकाकार या संज्ञा वापरात होत्या. मग विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात समीक्षा व समीक्षक या संज्ञा वापरल्या जाऊ लागल्या. टीका शब्दामागे दोषदर्शक आणि छिद्रान्वेषण असा लाक्षणिक अर्थ असल्यामुळे हा बदल झाला असावा. 'समीक्षा' शब्दांमध्ये समतोल पाहणे अभिप्रेत असल्यामुळे त्यातून समीक्षेविषयी व्यापक क्षेत्र सूचित होते. म्हणून समीक्षा व समीक्षक हे शब्द स्वीकारले गेले. थोडक्यात, समीक्षा म्हणजे कोणत्याही गोष्टीकडे समदृष्टीने पाहणे, योग्य प्रकारे पाहणे, कलाकृतीचे सर्व बाजूंनी निरीक्षण करणे, सांगोपांग विचार करणे, आंतरसौंदर्य दाखविणे व गुढ अर्थावर प्रकाश टाकणे असे म्हणता येईल. समीक्षा म्हणजे जाणकार रसिकांनी साहित्यकृतीचा आस्वाद घेऊन दिलेला हुंकार असते. कलाकृतीचे अवलोकन करून समीक्षकांनी दिलेली ती पावती असते.

आर्नोल्ड यांच्या मते, 'कलाकृतीतील गुणांची स्तुती करणे किंवा एखाद्या वस्तूचे यथार्थ अवलोकन करणे म्हणजे समीक्षा होय'. तर जॉन क्युटी 'समीक्षा म्हणजे निर्णय' असे सांगतात. श्री. के. क्षीरसागर यांना मात्र,



Scanned by CamScanner

कलाकृतीचा जाणकारपणे आस्वाद घेणे व आस्वादाच्या ओघातच आवश्यक तेथे मूल्यमापनालाही न कचरणे म्हणजे समीक्षा असे वाटते. त्याचबरोबर 'वाङ्मयीन टीका हा कधीच न संपणारा शोध आहे'. अशी भूमिका वा. ल. कुलकर्णी समीक्षेविषयी मांडतात.

साहित्यसमीक्षेच्या प्रयोजनाप्रमाणे कार्य ठरतात आणि कार्याच्या आवश्यकतेतून तिच्या पद्धती ठरतात. म्हणजे साहित्यातील आशय, अविष्कार, घाट, परिणाम आणि कार्य या अनुरोधाने समीक्षेच्या पद्धती वेगवेगळ्या पाहायला मिळतात. शब्दार्थाचा कीस काढणारी, केवळ कवीच्या शब्दातच त्यांच्या काव्याचे रसग्रहण करणारी, कवीचे चरित्र त्याच्या कलाकृतीतून शोधणारी, कलावंताच्या केवळ मनोविश्लेषणावर भर देणारी, भौतिक परिस्थितीच्या संदर्भात कलाकृतीचे मोल ठरविणारी, कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्कारात रंगून जाणारी अशा विविध प्रकारच्या समीक्षा पद्धती सांगितल्या जातात. त्याच पद्धतीला आस्वादक समीक्षा, रूपवादी समीक्षा, चरित्रात्मक समीक्षा, आदिबंधात्मक समीक्षा, ऐतिहासिक समीक्षा, समाजशास्त्रीय समीक्षा, मार्क्सवादी समीक्षा स्त्रीवादी समीक्षा व मानसशास्त्रीय समीक्षा या नावाने ओळखले जाते. समीक्षेच्या या विविध पद्धतीमध्ये मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती ही एक प्रभावी पद्धती आहे. एका अर्थाने संस्कारवादी आणि चरित्रात्मक या पद्धतीमध्ये मानसशास्त्रीय पद्धती समाविष्ट आहे, असे म्हणता येईल. गेल्या शंभर वर्षामध्ये जगभर मानवी मनाचा अभ्यास करणारे शास्त्र हे अतिशय प्रगत झाले असल्यामुळे त्याचा प्रभाव जीवनाच्या अनेक अंगावर पडत आहे. गेल्या शतकभरातील संशोधनामध्ये साहित्यनिर्मितीचे स्वरूप, साहित्याचा आस्वाद, कलानंद मीमांसा याबाबतीत मानसशास्त्राने नवीन प्रकाश टाकला आहे. ॲरिस्टॉटल हा मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा पहिला उद्गाता आहे. तर खरा भाष्यकार सिग्मंड फ्राइड हा आहे.

वाङ्मय हे मानवी प्रज्ञेचे व प्रतिभेचे वैशिष्ट्ये आहे. ते संस्कृतीची उभारणी करते. वाङ्मयाचा अभ्यास मनन, चिंतन इत्यादी विविध अंगानी केला जातो. मानसशास्त्रीय समीक्षा ही एक अभ्यास पद्धती आहे, दृष्टिकोन आहे. या पद्धतीने समीक्षेला नवे वळण, नवा अर्थ दिला याचा विचार येथे अभिप्रेत आहे. ही पद्धती सुरुवातीला मानवी मनाचा अभ्यास करते. मानवी मन हे अतिशय गुंतागुंतीची असते. त्या मनाचा आविष्कार कलाकृतीत कसा- कसा होतो, तसेच वाङ्मय आणि मानवी मन याचा परस्पर संबंध मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीने तपासता येतो. या संबंधावर पहिल्यांदा प्रकाश टाकला तो ॲरिस्टॉटलने. रीचर्डस यांच्या मते 'समीक्षेची तांत्रिक व मानसिक असे दोन रूपे असतात, त्यापैकी मानसिक प्रतिक्रिया हीच खरी समीक्षा होय'. माणसांमध्ये दोन मने असतात एक प्रकट मन (जाणीवयुक्त मन) व दुसरे अप्रकट मन(नेणीवयुक्त मन) अप्रकट मन सुप्त (अचेतन मन) असते तर प्रकट मन जागृत (चेतन मन) असते. मानसशास्त्रज्ञानी कलानिर्मिती चेतन मनातच होते असे न मानता अचेतन मनाचे विशेष



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

महत्व मानले. चेतन मनाची शिवाकडे तर अचेतन मनाची सौंदर्याकडे आकृष्ट होण्याची प्रवृत्ती असते. सीत निर्मितीत या विरोधी वाटणाऱ्या प्रवृत्तीचा समन्वय साधलेला दिसून येतो.

प्रकट मन आणि अप्रकट मन यांच्या मध्यावर सदसद्विवेक बुद्धी असते, ती नेहमी अप्रकट मनाला आयाम करते व तिला प्रकट पातळीवर नेण्याचा प्रयत्न करते.

"मन वढाय वढाय
उभ्या पिकातलं ढोर
कीती हाकला हाकला
फिर येई पिकावर"

या बहिणाबाईच्या काव्यपंक्तीतून मनातला संघर्ष व्यक्त होतो. मानवी मनाचा सखोल अभ्यास मनोविश्लेषण शास्त्रज्ञांनी केला. त्याला एक वेगळा आशय , संदर्भ मिळवून देण्यासाठी फ्राईडने प्रयत्न केला. त्यांनी जो मानवी मनाचा वेध घेतला त्यातून साऱ्या जगाचे लक्ष वेधले जाऊन साहित्याकडे बघण्याचा सर्वांचा दृष्टीकोण बदलला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर रामायण, महाभारत या महाकव्याकडे मानसशास्त्रीय दृष्टीने पाहण्यात येऊ लागले. त्यातील अनेक व्यक्तींची मने तपासण्यात येऊ लागली. इरावती कर्वे व दुर्गा भागवत यांनी महाभारतातील माणसांची मने तपासली आहेत. कला निर्मितीचे स्वरूप मुळातच विवेचनात्मक असते. लेखकाच्या दबलेल्या वा दडलेल्या वासनांना प्रकट होण्यास वाव मिळाला पाहिजे म्हणजे त्याला व अशा चित्रीकरणाने अप्रत्यक्षपणे वाचकांच्याही मनाचे विरेचन होऊन त्याला अशा दोघांनाही शांती लाभते.

मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीने कलेचे प्रयोजन, कलानिर्मितीचे स्वरूप व कलानंद या सर्वच बाबतीत काही ना काही नवीन प्रकाश टाकलेला दिसतो. कलानिर्मितीमध्ये जाणीवेचे नव्हे तर नेणिवेचे स्थान महत्त्वाचे असते, ही भूमिका मानसशास्त्रज्ञांनी मांडल्यामुळे रचनातंत्राला वा त्यातील कौशल्याला पूर्वीसारखे महत्वच उरत नाही. एखाद्या व्यक्तिचा स्वभाव कसा आहे याला महत्त्व न  देता त्या पात्राचे अंतर्मन आणि त्यातील संघर्ष व्यक्त करणे या समीक्षकांना महत्वाचे वाटते. एखाद्या पात्राची मनोरचना अशी बनण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत आहे, त्या पात्राच्या प्रकट बाजू कोणत्या, त्यांच्या अंतर्मनातील खळबळ याचा शोध घेतला जाऊ लागला. अहगंड, न्यूनगंड, भयगंड यासारखे मानसशास्त्रातील अनेक पारिभाषिक शब्द या समीक्षेत सर्रास वापरले जाऊ लागले.

कलानिर्मितीच्या मुळाशी मनोव्यापाराचा असतात. कलानिर्मितीच्या क्षणी मानसिक क्रिया-प्रक्रिया घडत असतात. आणि कलेच्या आस्वादाची प्रक्रियाही प्रामुख्याने मानसिकच असते. अशा मनाचा शोध घेणे हे कलावंतपुढे एक आव्हान असते. या सर्व प्रक्रियेत मानसशास्त्रीय शोधांचे व अभ्यासाचे सहाय्य नक्कीच होऊ शकते. मर्ढेकरापासून



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

आलेली कविता मानसशास्त्राचा संसार पुरेपूर दाखविते ते विविध कल्पना चित्रे कवितेत आढळतात. त्यात विरोध, संवाद, तोल, मनाची गूढता, तरलता याचे चित्रण येते. अशाप्रकारे नव्या कवितेत अंतरबोध देण्याचा प्रयत्न केलेला असतो. उदा. 'रात्र पंक्चरणे' म्हणजे जीवन निकामी होणे, अशी बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेतील अर्थाची बदलती रूपे ध्यानात घ्यावी लागतात. अलीकडील आशा नवकविता म्हणजे रसिक, वाचक यांना एक आव्हानच आहे. ते आव्हान मानवी मनाने उभे केले आहे.

पाश्चात्य नाटकात 'ऑथेल्लो' , 'हॅम्लेट' , 'जुलियस सीझर' इत्यादी नाटकातून शेक्सपिअर यांनी मानवी मनाचे कंगोरे पाहिलेले आहेत. उदा. हॅम्लेट आपल्या मनालाच प्रश्न विचारतो, 'to be or not to be'. (जगावं की मरावं) मराठी नाटकात पहिल्याप्रथम मानवी मनाचा विचार कृ. प्र. खाडिलकर यांनी केला .उदा. 'विद्याहरण' मधील शुक्राचार्य आपल्या मनाशी कठोर संवाद साधतो. 'कीचकवध' मध्ये द्रौपदी स्वतःला विचारते, 'माझी अवस्था अशी का व्हावी', 'एकच प्याला' मध्ये राम गणेश गडकरी यांनी सुधाकर- सिंधूचे मन तपासण्याचा प्रयत्न केला आहे. 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकात वसंत कानेटकर शिवाजी राजे व शंभू राजे यांचे मन तपासताना दिसतात, तर 'नटसम्राट' मध्ये वि.वा.शिरवाडकर गणपतराव बेलवलकर यांचे मन तपासतात. अशाप्रकारे दुसऱ्या महायुद्धानंतरची नाटके मानवी मनातील आंदोलने टिपणारी आहेत. 'रात्रीचा दिवस' (मर्ढेकर), 'स्वामी' (रणजित देसाई), 'अजगर' (खानोलकर), 'ऑक्टोपस' (पेंडसे), 'उभयान्वयी' (भाऊ पाध्ये) इत्यादी कादंबऱ्यातून मनोविश्लेषण आलेले आहे. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेतही मानसशास्त्रीय दृष्टी आपणास दिसते.

मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती 'कलाकृती ही स्वायत्त संघटना आहे' असे मानते. उदा. 'फुलराणी' त्यावर कुणाचेच दडपण राहत नाही. कलाकृतीच्या सौंदर्यवत्तेची पाहणी मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती करते. प्रकृतीने मानसशास्त्रीय पद्धती विज्ञानवादी आहे. कलावंताचे व्यक्तिमत्व, त्याने साधलेला भावनिक तोल, त्याने घेतलेला शोध इत्यादी बाबी मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती ध्यानात येते. ही समीक्षा पद्धती एक स्वरूपी नाही. तर प्रत्येक वाङ्मय प्रकाराप्रमाणे तिचे स्वरूप बदलत असते. ही पद्धती कलाकृतीची सेंद्रिय प्रकृती लक्षात घेते.

त्याचबरोबर मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती स्वभाव विश्लेषणावर अधिक भर देणारी आहे. मानवी मनातील भावभावना, आकांक्षा यांचे स्पष्टीकरण ही पद्धती करते. उदा. 'काळोखाचे अंग' या ए.व्ही. जोशी यांच्या कादंबरीतील सुरेंद्र, मार्लिन, दमयंती यांच्या चित्रणातील मनोविश्लेषण पाहण्यासारखे आहे. मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती एकसंघ आहे. ती पात्रांच्या अंतर्मनाचा, आतील स्वभावाचा तपास घेते. मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती आकलन प्रधान आहे.



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

तत्व शोधणे तिचे काम नाही तर साहीत्याचे आकलन करून देणे तिचे काम आहे. यासारख्या अनेक कारणामुळे, समीक्षा पद्धतीने आस्वाद प्रक्रिया सखोल केली आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीतील काही दोष मान्य केले तरी ही पद्धत आधुनिक आहे. मनाचा विचार सखोलपणे करणारी, मानवी भावभावना इत्यादींना स्पर्श करणारी व साहित्य आस्वादास सहाय्य करणारी वैशिष्ट्यपूर्ण समीक्षा पद्धती आहे.

संदर्भ ग्रंथ

१) मराठी समीक्षेची सद्य:स्थिती - वसंत आबाजी डहाके

२) समीक्षा मीमांसा - गंगाधर पाटील

३) समीक्षा आणि समीक्षा पद्धती - डॉ. नीला पांढरे

४) समीक्षा पद्धती :सिद्धांत आणि उपयोजन - संपादन डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. नंदकुमार मोरे

५) साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या - वसंत पाटणकर



Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner